# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## कपिल गीत पंचम अध्याय(3.25)



नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्

तृतीय स्कंधः

॥ पञ्चविं(म्)शोऽध्यायः॥

शौनक उवाच

कपिलस्तत्त्वसङ्ख्याता, भगवानात्ममायया ।
जातः(स्) स्वयमजः(स्) साक्षा-दात्मप्रज्ञप्तये नृणाम् ॥ 1॥

शौनकांनी विचारले -तत्त्वांची संख्या करणारे भगवान कपिल साक्षात अजन्मा नारायण असून सुद्धा लोकांना आत्मज्ञानाचा उपदेश करण्यासाठी आपल्या मायेने उत्पन्न झाले होते.

न ह्यस्य वर्ष्मणः(फ्) पुं(म्)सां(वँ), वरिम्णः(स्) सर्वयोगिनाम् ।
विश्रुतौ श्रुतदेवस्य, भूरि तृप्यन्ति मेऽसवः ॥ 2॥

मी भगवंतांची पुष्कळशी चरित्रे ऐकली आहेत ,परंतु या योगी प्रवर पुरुष श्रेष्ठ कपिलांची कीर्ती ऐकूनही माझे मन तृप्त होत नाही.

यद्यद्विधत्ते भगवान्, स्वच्छन्दात्माऽऽत्ममायया ।

तानि मे श्रद्दधानस्य, कीर्तन्यान्यनुकीर्तय ॥ 3॥

सर्वथा स्वतंत्र असे श्रीहरी आपल्या योगमायेने ज्या लीला करतात ,त्या सर्व कथन करण्यायोग्य कथा श्रद्धावान मला आपण ऐकवाव्यात.

सूत उवाच

द्वैपायनसखस्त्वेवं(म्), मैत्रेयो भगवां(म्)स्तथा ।

प्राहेदं(वँ) विदुरं(म्) प्रीत, आन्वीक्षिक्यां(म्) प्रचोदितः ॥ 4॥

सूत म्हणाले -मुनिवर्य ,आपल्या प्रमाणेच जेव्हा विदुराने सुद्धा हाच आत्मज्ञानविषयक प्रश्न विचारला, तेव्हा ही व्यासांचे सुहृद भगवान मैत्रेय प्रसन्न होऊन म्हणाले.

मैत्रेय उवाच

पितरि प्रस्थितेऽरण्यं(म्), मातुः(फ्) प्रियचिकीर्षया ।

तस्मिन् बिन्दुसरेऽवात्सीद्-भगवान् कपिलः(ख्) किल ॥ 5॥

मैत्रेय म्हणाले - पिता वनात निघून गेल्यानंतर भगवान कपिल मातेला आनंद देण्याच्या इच्छेने बिंदू सर तीर्थावर राहू लागले.

तमासीनमकर्माणं(न्), तत्त्वमार्गाग्रदर्शनम् ।

स्वसुतं(न्) देवहूत्याह, धातुः(स्) सं(म्)स्मरती वचः ॥ 6॥

तत्व समूहाचे पारदर्शी भगवान कपिल एक दिवस स्वस्थपणे आसनावर बसले होते .त्यावेळी ब्रह्मदेवांच्या वचनाचे स्मरण होऊन देव होती आपल्या मुलाला म्हणाली.

देवहूतिरुवाच

निर्विण्णा नितरां(म्) भूमन्-नसदिन्द्रियतर्षणात् ।

येन सम्भाव्यमानेन, प्रपन्नान्धं(न्) तमः(फ्) प्रभो ॥ 7॥

देवहूती म्हणाली -हे सर्व व्यापी प्रभो ,या इंद्रियांच्या विषय लालसेने मी अत्यंत उद्विग्न झाले आहे आणि यांची इच्छा पूर्ण करण्यामुळे मी घोर अज्ञानांधकारात पडले आहे.

तस्य त्वं(न्) तमसोऽन्धस्य, दुष्पारस्याद्य पारगम् ।

सच्चक्षुर्जन्मनामन्ते, लब्धं(म्) मे त्वदनुग्रहात् ॥ 8॥

आता आपल्या कृपेने माझी जन्म परंपरा समाप्त झाली आहे आणि त्यामुळे या दुस्तर अंधकारातून पार पडण्यासाठी उत्कृष्ट नेत्र रूप असे आपण मला प्राप्त झाला आहात-

य आद्यो भगवान् पुं(म्)सा-मीश्वरो वै भवान् किल ।

लोकस्य तमसान्धस्य, चक्षुः(स्) सूर्य इवोदितः ॥ 9॥

आपण सर्व जीवांचे स्वामी भगवान आदि पुरुष आहात .तसेच अज्ञानांधकाराने अंध झालेल्या लोकांसाठी नेत्र स्वरूप असणारे आपण सूर्याप्रमाणे प्रकट झाला आहात.

अथ मे देव सम्मोह-मपाक्रष्टुं(न्) त्वमर्हसि ।

योऽवग्रहोऽहं(म्)ममेतीत्-येतस्मिन् योजितस्त्वया ॥ 10॥

देवा ,या देह गृह इत्यादींमध्ये जो मी _माझे पणाचा दुराग्रह असतो ,तोही आपणच निर्माण केला त .म्हणून आता आपण माझा हा महामोह नाहीसा करा.

तं(न्) त्वा गताहं(म्) शरणं(म्) शरण्यं(म्),

स्वभृत्यसं(म्)सारतरोः(ख्) कुठारम् ।

जिज्ञासयाहं(म्) प्रकृतेः(फ्) पूरुषस्य,

नमामि सद्धर्मविदां(वँ) वरिष्ठम् ॥ 11॥

आपण आपल्या भक्तांच्या संसाररूपवृक्षासाठी कुऱ्हाडीप्रमाणे आहात .प्रकृती आणि पुरुष यांचे ज्ञान प्राप्त करण्याच्या इच्छेने मी शरणागत वत्सल आपणास शरण आले आहे .भागवत धर्म जाणणाऱ्या तआपण सर्वश्रेष्ठ आहात .मी आपणास प्रणाम करीत आहे.

मैत्रेय उवाच

इति स्वमातुर्निरवद्यमीप्सितं(न्),

निशम्य पुं(म्)सामपवर्गवर्धनम् ।

धियाभिनन्द्यात्मवतां(म्) सतां(ङ्) गतिर्-

बभाष ईषत्स्मितशोभिताननः ॥ 12॥

मैत्रेय म्हणाले -अशाप्रकारे माता देवभूतीने परम पवित्र आणि लोकांना मोक्ष मार्गाबद्दल प्रेम उत्पन्न करणारी आपली इच्छा प्रगट केली .ती ऐकून आत्मज्ञान सत्पुरुषांचे गणतव्य असणारे शी कपिलमुनी तिची मनापासून प्रशंसा करू लागले आणि नंतर मंद हास्याने शोभणाऱ्या मुखाने म्हणाले.

श्रीभगवानुवाच

योग आध्यात्मिकः(फ्) पुं(म्)सां(म्) मतो निः(श्)श्रेयसाय मे ।

अत्यन्तोपरतिर्यत्र दुःखस्य च सुखस्य च ॥ 13॥

भगवान कपिल म्हणाले -माते ,सुखा दुःखाची सर्वस्वी निवृत्ती करणारा अध्यात्म योग हाच मनुष्याच्या अत्यंत कल्याणाचे प्रमुख साधन आहे ,असे माझे मत आहे.

तमिमं(न्) ते प्रवक्ष्यामि, यमवोचं(म्) पुरानघे ।

ऋषीणां(म्) श्रोतुकामानां(यँ), योगं(म्) सर्वाङ्गनैपुणम् ॥ 14॥

माते ,पूर्वी नारद आदी ऋषींनी ऐकण्याची इच्छा व्यक्त केल्यावर ,सर्व अंगानी संपन्न अशा योगाचे मी वर्णन केले होते ,तेच मी मी आता तुला सांगतो.

चेतः(ख्) खल्वस्य बन्धाय, मुक्तये चात्मनो मतम् ।

गुणेषु सक्तं(म्) बन्धाय, रतं(वँ) वा पुं(म्)सि मुक्तये ॥ 15॥

या जीवाला बद्ध करण्यास आणि मोक्ष मिळवून देण्यास मन हेच कारण मानले गेले आहे .विषयात आसक्त झाल्यास ते बंधनाला कारणीभूत ठरते ; तर परमात्म्यातरमल्यास मोक्षाला कारण ठरते.

अहं(म्)ममाभिमानोत्थैः(ख्), कामलोभादिभिर्मलैः ।

वीतं(यँ) यदा मनः(श्) शुद्ध-मदुःखमसुखं(म्) समम् ॥ 16॥

ज्यावेळी हे मन 'मी आणि माझे ' या अभिमानाने उत्पन्न होणाऱ्या काम ,लोभ इत्यादी विकारांपासून मुक्त होऊन शुद्ध होते ,त्यावेळी ते सुखदुःखांपासून वेगळे होऊन सम अवस्थेला प्राप्त होते.

तदा पुरुष आत्मानं(ङ्), केवलं(म्) प्रकृतेः(फ्) परम् ।

निरन्तरं(म्) स्वयं(ञ्)ज्योति-रणिमानमखण्डितम् ॥ 17॥

ज्ञानवैराग्ययुक्तेन, भक्तियुक्तेन चात्मना ।

परिपश्यत्युदासीनं(म्), प्रकृतिं(ञ्) च हतौजसम् ॥ 18॥

त्यावेळी जीव आपल्या ज्ञान ,वैराग्य आणि भक्तीने युक्त अशा हृदयाने आत्मा प्रकृतीच्या पलीकडील, अद्वितीय भेद रहित स्वयंप्रकाश ,सूक्ष्म ,अखंड आणि सुखदुःख रहित असून प्रकृती शक्ती हिन आहे, असा अनुभव करतो.

न युज्यमानया भक्त्या, भगवत्यखिलात्मनि ।

सदृशोऽस्ति शिवः(फ्) पन्था, योगिनां(म्) ब्रह्मसिद्धये ॥ 19॥

योग्यांना भगवतप्राप्तीसाठी सर्वात मा श्रीहरीच्या भक्ती सारखा दुसरा कोणताच कल्याणकारक मार्ग नाही.

प्रसङ्गमजरं(म्) पाश-मात्मनः(ख्) कवयो विदुः ।

स एव साधुषु कृतो, मोक्षद्वारमपावृतम् ॥ 20॥

आ सक्तीलाच विवेकी लोक आत्म्याचे व तुटणारे बंधन मानतात. परंतु तिच जेव्हा महापुरुषांच्या बाबतीत निर्माण होते ,तेव्हा तीच मोक्षाचे उघडलेले दार समजावी.

तितिक्षवः(ख्) कारुणिकाः(स्), सुहृदः(स्) सर्वदेहिनाम् ।

अजातशत्रवः(श्) शान्ताः(स्), साधवः(स) साधुभूषणाः ॥ 21॥

मय्यनन्येन भावेन, भक्तिं(ङ्) कुर्वन्ति ये दृढाम् ।
मत्कृते त्यक्तकर्माणस्-त्यक्तस्वजनबान्धवाः ॥ 22॥
मदाश्रयाः(ख्) कथामृष्टाः(श्), शृण्वन्ति कथयन्ति च ।
तपन्ति विविधास्तापा, नैतान्मद्गतचेतसः ॥ 23॥

जे लोक सहनशील ,दयाळू 'सर्व प्राण्यांचे निष्काम हितेच्छू ,कोणाबद्दलही शत्रुत्वाची भावना न ठेवणारे ,शांत ,सरळ स्वभावाचे आणि सतपुरुषांचा सन्मान करणारे असतात ,जे माझ्यावर अनन्य भावाने दृढ प्रेम करतात .माझ्यासाठी सर्व सकामकर माणसा तसेच आपल्या स ग्या सोयऱ्यांचा त्याग करतात आणि मत परायण होऊन माझ्या पवित्र कथांचे श्रवण ,किर्तन करतात तसेच माझ्यातच चित्त लावतात ,त्या भक्तांना संसारातील निरनिराळे ताप मुळीच दुःख देऊ शकत नाही त.

त एते साधवः(स्) साध्वि, सर्वसङ्गविवर्जिताः ।
सङ्गस्तेष्वथ ते प्रार्थ्यः(म्), सङ्गदोषहरा हि ते ॥ 24॥

हे साध्वी, अशा रीतीने सर्व संघपरित त्याग केलेले महापुरुषच साधू समजावेत. तू त्यांच्या च सहवासाची इच्छा धरावीस ,कारण  आसक्तीमुळे निर्माण होणाऱ्या दोषांचे ते निराकरण करतात.

सतां(म्) प्रसङ्गान्मम वीर्यसं(वँ)विदो
भवन्ति हृत्कर्णरसायनाः(ख्) कथाः ।
तज्जोषणादाश्वपवर्गवर्त्मनि
श्रद्धा रतिर्भक्तिरनुक्रमिष्यति ॥ 25॥

सत्पुरुषांच्या सहवासातच माझ्या पराक्रमाचे यथार्थ ज्ञान करून देणाऱ्या तसेच मनाला आणि कानांना प्रिय वाटणाऱ्या कथा होतात .अशा कथांचे सेवन केल्यानेच मोक्ष मार्गामध्ये श्रद्धा ,प्रेम आणि भक्तीचा क्रमशः विकास होतो.

भक्त्या पुमान् जातविराग ऐन्द्रिया-
द्दृष्टश्रुतान् मद्रचनानुचिन्तया ।
चित्तस्य यत्तो ग्रहणे योगयुक्तो
यतिष्यते ऋजुभिर्योगमार्गैः ॥ 26॥

नंतर माझ्या विश्व पत्ती इत्यादी लीलांचे चिंतन केल्याने उत्पन्न झालेल्या भक्तीने लौकिक आणि पारलौकिक सुखांच्या बाबतीत वैराग्य उत्पन्न झाल्याने मनुष्य दक्षतेने योगाच्या भक्ती प्रधान सरळ साधन मार्गांनी एकाग्र होऊन मनोनिग्रहासाठी प्रयत्न करतो.

असेवयायं(म्) प्रकृतेर्गुणानां(ञ्),

ज्ञानेन वैराग्यविजृम्भितेन ।

योगेन मय्यर्पितया च भक्त्या

मां(म्) प्रत्यगात्मानमिहावरुन्धे ॥ 27॥

अशाप्रकारे प्रकृतीच्या गुणांपासून उत्पन्न झालेल्या शब्दा दी विषयांचा त्याग केल्याने ' वैराग्य युक्त ज्ञानाने ,योगामुळे आणि माझ्या धुळभक्तीने अंतरात्मा असलेल्या मला ,मनुष्य या देहातच प्राप्त करून घेतो.

देवहूतिरुवाच

काचित्त्वय्युचिता भक्तिः(ख्), कीदृशी मम गोचरा ।

यया पदं(न्) ते निर्वाण-मञ्जसान्वाश्नवा अहम् ॥ 28॥

देवहूती म्हणाली -आपल्या समुचित भक्तीचे स्वरूप काय आहे ?आणि मला कशा प्रकारची भक्ती योग्य आहे ?ज्यायोगे मी सहजपणे आपले निर्वाण पद प्राप्त करू शके न ?

यो योगो भगवद्बाणो, निर्वाणात्मं(म्)स्त्वयोदितः ।

कीदृशः(ख्) कति चाङ्गानि, यतस्तत्त्वावबोधनम् ॥ 29॥

हे निर्वाण स्वरूपप्रभो !ज्याच्यामुळे तत्त्वज्ञान होते आणि जो लक्षाचा वेध घेणाऱ्या बाणाप्रमाणे भगवंतांची प्राप्ती करून देणार आहे ,तो आपण सांगितलेला योग कसा आहे आणि त्याची किती अंगे आहेत ?

तदेतन्मे विजानीहि, यथाहं(म्) मन्दधीर्हरे ।

सुखं(म्) बुद्ध्येय दुर्बोधं(यँ), योषा भवदनुग्रहात् ॥ 30॥

हे हरे ,हे सर्व आपण मला  अशा प्रकारे समजावून सांगा की ज्यामुळे आपल्या कृपेने मी मंदबुद्धी स्त्री हा कठीण विषय सहजपणे समजू शके न.

मैत्रेय उवाच

विदित्वार्थं(ङ्) कपिलो मातुरित्थं(ञ्),

जातस्नेहो यत्र तन्वाभिजातः ।

तत्त्वाम्नायं(यँ) यत्प्रवदन्ति साङ्ख्यं(म्)

प्रोवाच वै भक्तिवितानयोगम् ॥ 31॥

मैत्रेय म्हणाले -विदुरा ,जिच्यापासून त्यांनी स्वतः जन्म घेतला होता ,त्या आपल्या मातेचा असा अभिप्राय ऐकून कपिलांच्या हृदयात स्नेह दाटून आला आणि त्याने प्रकृती इत्यादी तत्त्वांचे निरुपण करणाऱ्या सांख्यशास्त्राचा आणि भक्ती व योग यांचा उपदेश केला.

श्रीभगवानुवाच

देवानां(ङ्) गुणलिङ्गाना-मानुश्रविककर्मणाम् ।

सत्त्व एवैकमनसो, वृत्तिः(स्) स्वाभाविकी तु या ॥ 32॥

अनिमित्ता भागवती, भक्तिः(स्) सिद्धेर्गरीयसी ।

जरयत्याशु या कोशं(न्), निगीर्णमनलो यथा ॥ 33॥

श्री भगवान म्हणाले -माते ,ज्यांचे चित्त एकमात्र भगवंतामध्येच लागले आहे ,अशा माणसांची वेदविहीत कर्मांमध्ये लागलेली तसेच विषयांचे ज्ञान करून देणाऱ्या इंद्रियांची जी सत्वमूर्ती श्रीहरींच्या ठिकाणी स्वाभाविक प्रवृत्ती होते ,तीच भगवंतांची निर्हेतुक भक्ती होय .ही मुक्ती पेक्षाही श्रेष्ठ आहे .कारण ज्याप्रमाणे जठराग्नी खाल्लेल्या अन्नाचे पचन करतो ,त्याप्रमाणे ही सुद्धा कर्म संस्कारांचे भांडार असलेल्या लिंग शरीराला तात्काळ भस्म करते.

नैकात्मतां(म्) मे स्पृहयन्ति केचि-

न्मत्पादसेवाभिरता मदीहाः ।

येऽन्योन्यतो भागवताः(फ्) प्रसज्य

सभाजयन्ते मम पौरुषाणि ॥ 34॥

माझ्या चरणसेवेत प्रेम असणारे आणि माझ्याच प्रसन्नतेसाठी सर्व कर्मे करणारे जितके भाग्यवान भक्त आहेत, जे एकमेकांना भेटून प्रेमाने माझ्याच पराक्रमांची चर्चा करतात ,ते माझ्याशी एकरूप होण्याचीही इच्छा करीत नाहीत.

पश्यन्ति ते मे रुचिराण्यम्ब सन्तः(फ्),

प्रसन्नवक्त्रारुणलोचनानि ।

रूपाणि दिव्यानि वरप्रदानि

साकं(वँ) वाचं(म्) स्पृहणीयां(वँ) वदन्ति ॥ 35॥

माते ,ते साधू पुरुष अरुणा नयना आणि मनोहर मुखाने युक्त अशा माझ्या परमसुंदर आणि वरदायक दिव्य रूपाचे अवलोकन करतात आणि त्यांच्याबरोबर प्रेमपूर्वक संभाषणही करतात की 'ज्याच्यासाठी मोठमोठे तपस्वी ही उत्सुक असतात.

तैर्दर्शनीयावयवैरुदार-

विलासहासेक्षितवामसूक्तैः ।

हृतात्मनो हृतप्राणां(म्)श्च भक्ति-

रनिच्छतो मे गतिमण्वीं(म्) प्रयुङ्क्ते ॥ 36॥

सुंदर अंगप्रत्यंग ,मधुर हास्य -विलासयुक्त मनोहर दृष्टी आणि सुमधुरवाणीने युक्त माझ्या त्या रूपाच्या सौंदर्यात त्यांची मने आणि इंद्रिय तल्लीन होतात .माझी अशी भक्ती त्यांची इच्छा नसतानाही ,त्यांना परम पदाची प्राप्ती करून देते.

अथो विभूतिं(म्) मम मायाविनस्ता-

मैश्वर्यमष्टाङ्गमनुप्रवृत्तम् ।

श्रियं(म्) भागवतीं(वँ) वा स्पृहयन्ति भद्रां(म्)

परस्य मे तेऽश्नुवते तु लोके ॥ 37॥

अ विद्येची निवृत्ती झाल्यानंतर जरी ते माझ्या माया पतीच्या  सत्यादी लोकांमधील भोगसंपत्ती ,भक्ती नंतर स्वतः प्राप्त होणाऱ्या अष्ट सिद्धी किंवा वैकुंठ लोकातील भगवत स्वरूप ऐश्वर्याचे सुद्धा इच्छा करीत नाहीत .तरीसुद्धा माझ्या धामाला पोचल्यानंतर त्यांना या सर्व विभूती आपण होऊन प्राप्त होतात.

न कर्हिचिन्मत्पराः(श्) शान्तरूपे,

नङ्क्ष्यन्ति नो मेऽनिमिषो लेढि हेतिः ।

येषामहं(म्) प्रिय आत्मा सुतश्च,

सखा गुरुः(स्) सुहृदो दैवमिष्टम् ॥ 38॥

ज्यांचा एक मात्र मीच प्रिय आत्मा ,पुत्र ,मित्र ,गुरु, सुहृदआणि इष्टदेव आहे "ते माझ्याच आश्रयाला राहणारे भक्तजना शांतीमय अशा वैकुंठ धामात गेल्यावर कोणत्याही प्रकारे या भोगांपासून वंचित राहत नाहीत आणि त्यांना माझे कालचक्र ग्रासू शकत नाही.

इमं(लँ) लोकं(न्) तथैवामु-मात्मानमुभयायिनम् ।

आत्मानमनु ये चेह, ये रायः(फ्) पशवो गृहाः ॥ 39॥

विसृज्य सर्वानन्यां(म्)श्च, मामेवं(वँ) विश्वतोमुखम् ।

भजन्त्यनन्यया भक्त्या, तान् मृत्योरतिपारये ॥ 40॥

जे इहलोक ,परलोक आणि या दोन्ही लोकांमध्ये बरोबर जाणाऱ्या वासनामुळे लिंगदेहाला तसेच शरीराशी संबंध ठेवणारे जेधन ,पशु तसेच गृह इत्यादी पदार्थ आहेत ,त्या सर्वांना आणि ततसंबंधी संग्रहाला सुद्धा सोडून देऊन अनन्य भक्तीने सर्व प्रकारे माझेच भजन करतात ,त्यांना मी मृत्यू रूप संसार सागरातून पार करतो.

नान्यत्र मद्भगवतः(फ्), प्रधानपुरुषेश्वरात् ।

आत्मनः(स्) सर्वभूतानां(म्), भयं(न्) तीव्रं(न्) निवर्तते ॥ 41॥

मी साक्षात भगवान आहे .प्रकृती आणि पुरुषाचा मी स्वामी आहे .तसेच समस्त प्राण्यांचा आत्मा आहे .माझ्या खेरीज अन्य कोणाचाही आश्रय घेतल्याने मृत्यू रुपये महाभयापासून सुटका होत नाही.

मद्भयाद्वाति वातोऽयं(म्), सूर्यस्तपति मद्भयात् ।

वर्षतीन्द्रो दहत्यग्निर्-मृत्युश्चरति मद्भयात् ॥ 42॥

माझ्या भयानेच वारा वाहतो .माझ्या भयानेच सूर्य तापतो ,माझ्या भयाने चंद्र पाऊस पाडतो आणि अग्नी जाळतो .तसेच माझ्याच भयाने मृत्यू आपल्या कार्यात प्रवृत्त होतो.

ज्ञानवैराग्ययुक्तेन, भक्तियोगेन योगिनः ।

क्षेमाय पादमूलं(म्) मे, प्रविशन्त्यकुतोभयम् ॥ 43॥

योगीजन ज्ञान वैराग्य युक्त भक्तियोगाच्याद्वारे शांती प्राप्त करून घेण्यासाठी माझ्या निर्भय चरण कमलांचा आश्रय घेतात.

एतावानेव लोकेऽस्मिन्, पुं(म्)सां(न्) निः(श्)श्रेयसोदयः ।

तीव्रेण भक्तियोगेन, मनो मय्यर्पितं(म्) स्थिरम् ॥ 44॥

संसारात मनुष्यांचे सर्वात श्रेष्ठ कल्याण हेच आहे की ,त्यांचे चित्त भक्तीयोगाने माझ्यातच लागून तेथेच स्थिर व्हावे.

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(न्)

तृतीयस्कन्धे कापिलेयोपाख्याने पञ्चविं(म्)शोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥